
# वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांची निश्चिती

## धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडून महत्त्वाचे पाऊल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत धारावीतील वरच्या मजल्यांवरील सदनिकाधारकांनाही धारावीबाहेर घरे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आता धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडून (डीआरपी) पहिले महत्त्वाचे पाऊल उचलले जाणार आहे. वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांच्या पात्रता निश्चिती प्रक्रियेला लवकरच सुरुवात केली जाणार आहे.

वरच्या मजल्यावरील सदनिकाधारक पात्र ठरण्यासाठी तळमजल्यावरील पात्र रहिवाशांचेच प्रतिज्ञापत्र बंधनकारक असेल. तळमजल्यावरील सदनिकाधारक पात्र असेल तरच वरच्या मजल्यावरील सदनिकाधारक पात्र ठरणार असल्याचे डीआरपीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पात धारावीतील पात्र झोपडीधारकांना ३०० चौ. फुटाऐवजी ३५० चौ. फुटांची घरे दिली जाणार आहेत. तर या प्रकल्पांतर्गत पहिल्यांदाच अपात्र सदनिकाधारकांचे, वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांचेही पुनर्वसन केले जाणार आहे.



### प्रत्येक कुटुंबाला एकच घर

तळमजल्यावरील सदनिकाधारक अपात्र ठरल्यास वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकही अपात्र ठरेल असेही डीआरपीने स्पष्ट केले आहे. तसेच प्रत्येक कुटुंबाला एकच घर मिळणार असून एकाच कुटुंबातील पती, पत्नी आणि मुलांना स्वतंत्रपणे अर्ज करता येणार नसल्याचेही डीआरपीने नमूद केले आहे.

मात्र त्यांचे धारावीत नव्हे तर धारावीबाहेर वेगवेगळ्या ठिकाणी भाडेतत्त्वावरील घरांच्या माध्यमातून पुनर्वसन केले जाणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पहिल्यांदाच अशाप्रकारचे अपात्र आणि वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना पुनर्वसन योजनेत सामावून घेतले जाणार आहे. तेव्हा आता राज्य सरकारच्या या निर्णयाच्या अंमलबजावणीला डीआरपीकडून सुरुवात होणार आहे.

तळमजल्यावरील रहिवाशांची पात्रता निश्चिती पूर्ण झाल्यानंतर आता डीआरपीने वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांची पात्रता निश्चिती करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन निर्णयानुसार धारावीतील १५ नोव्हेंबर २०२२ पूर्वी धारावीत वास्तव्यास असलेल्या वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना पुनर्विकासात सामावून घेतले जाणार आहे. त्यांना भाडेतत्त्वावरील ३०० चौ. फुटांची घरे धारावीबाहेर दिली जाणार आहेत. भाडेकरार-खरेदी किंवा २५ वर्षांसाठी नाममात्र भाडे आकारून २६व्या वर्षी घराची मालकी संबंधित सदनिकाधारकाला दिली जाणार आहे.

# मेट्रो ४ अपघातांचा चौकशी अहवाल सार्वजनिक करा

## आमदार मिहीर कोटेचा यांची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** मुलुंड येथील मेट्रो ४ च्या कामावेळी संरक्षक कठडा कोसळून झालेला एका व्यक्तीचा मृत्यू, त्याचप्रमाणे धावत्या कारवर लाकडी फळी कोसळण्याची घटना या अपघातांवरून मेट्रोच्या कामात सुरक्षेच्या दृष्टीने त्रूटी राहत असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे या दोन्ही अपघातांचे चौकशी अहवाल सार्वजनिक करण्यात यावेत व दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी भाजप आमदार मिहीर कोटेचा यांनी केली आहे.

एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी यांना पाठवलेल्या पत्रात कोटेचा यांनी मुलुंड पश्चिम येथील लाल बहादूर शास्त्री मार्गावर सुरू असलेल्या मुंबई मेट्रो लाईन ४ प्रकल्पस्थळी वारंवार होणाऱ्या सुरक्षा त्रुटींचा मुद्दा उपस्थित केला. एकाच ठिकाणी अशा घटना वारंवार घडत असल्याने ही गंभीर बाब असून नियमांचे पालन होत नसल्याची गंभीर बाब पत्रात नमूद करण्यात आली आहे.


केनरा बैंक Canara Bank

BOBCAPS
TRUST | INNOVATION | EXCELLENCE
(A wholly owned subsidiary of Bank of Baroda)

**स्विस चॅलेंज मेथडचे अनुसरण करून खूल्या लिलाव प्रक्रियेअंतर्गत अनुमती दिलेले हस्तांतरिती व एआरसीजकरिता मेसर्स राजेश एक्सपोर्ट्स लिमिटेडच्या ("आरईएल") स्ट्रेस्ड लोन एक्सपोजरच्या हस्तांतरणासंबंधित स्वारस्याची अभिव्यक्ती ("ईओआय") मागविणारी जाहीरात**

"कॅनरा बँके"च्या ("**सीबी**" किंवा "**बँक**" किंवा "**धनको**") वतीने **बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड ("बीओबीसीएपीएस" / "प्रक्रिया सल्लागार")** प्रक्रिया सल्लागार म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली, याद्वारा आरबीआय (कमर्शियल बँक्स - पत जोखिमेचे हस्तांतरण व वितरण) निदेश, २०२५, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार ("**आरबीआय निदेश**") आणि धनकोंचे आंतर बोर्ड मान्यताप्राप्त धोरण समाविष्ट परंतु मर्यादित नसलेले, लागू कायद्यांच्या अनुसार पात्र आणि त्याअंतर्गत व्याख्या केल्यानुसार पात्र एआरसीज, बँक्स, एनबीएफसीज, ऑल इंडिया फायनान्शियल इन्स्टिट्यूशन्स व अन्य अनुमती असलेले हस्तांतरिती (एकत्रीतरीत्या "**अनुमती असलेले हस्तांतरिती**" **किंवा** "**बोलीदार**") यांच्याकडून स्वारस्याची अभिव्यक्ती ("**ईओआय**") मागवीत आहेत.

**व्यवहाराचे स्वरूप :** धनको बोली प्रक्रिया कागदपत्रांत ("**बीपीडी**") नमूद केल्यानुसार स्विस चॅलेंज मेथडद्वारा ("**एससीएम**") अनुसरण करून खुल्या लिलाव प्रक्रियेमार्फत "**सर्व रोख**" आधारे पात्र अनुमती असलेल्या हस्तांतरितींकरिता, काटेकोरपणे "**जसे आहे जेथे आहे**", "**जसे आहे जे काही आहे**", "**जे काही आहे जसे आहे**", "**जे काही आहे तेथे आहे**" आणि "**कोणत्याही आधाराशिवाय**" **आयएनआर ५०९.३७ कोटी (रुपये पाचशे नऊ कोटी व सदोतीस लाख फक्त)** या एकूण देणींसह, "आरईएल"च्या स्ट्रेस्ड लोन एक्सपोजरची विक्री / हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव ठेवीत आहेत. धनको स्ट्रेस्ड लोन एक्सपोजर संबंधित कोणतेही व्यवहार, कायदा किंवा अन्य कोणतीही जोखीम गृहीत धरणार नाहीत आणि "आरईएल"च्या बाबतीत कोणतेही प्रतिनिधित्व, वॉरंटीज किंवा आश्वासनांची तरतूद करणार नाहीत.

**ईओआयचे सादरीकरण :** प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पात्र अनुमती दिलेल्या हस्तांतरितींना विनंती करण्यात येते की, त्यांचे ईओआय व अन्य कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे (१) **इलेक्ट्रॉनिक प्रणालीत**, ईमेलद्वारा : cb2636@canarabank.com & project.beta@bobcaps.in; आणि **प्रत्यक्ष स्वरूपात** (२) श्री. सागर भद्रा - सहाय्यक उपाध्यक्ष, बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, बी-१७०४, परिनी क्रेसेन्झो, जी ब्लॉक, बीकेसी, बांद्रा (पू), मुंबई - ४०००५१ यांच्याकडे यथोचितरीत्या निष्पादित व स्टॅंप्ड मूळ कागदपत्रे पाठवावीत. **ईओआय व अन्य कागदपत्रांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख ०७ मे, २०२६ आहे.**

**बोली प्रक्रिया कागदपत्र :** बोली प्रक्रिया कागदपत्र "बीओबीसीएपीएस"च्या वेबसाइटवर (www.bobcaps.in/tenders) आणि कॅनरा बँकेच्या वेबसाइटवर (www.canarabank.bank.in) उपलब्ध आहे.

स्वारस्य असलेले व अनुमती असलेले हस्तांतरिती कोणत्याही शंका / स्पष्टीकरणाकरिता खालील प्रतिनिधींशी संपर्क साधू शकतील :

| संपर्क व्यक्ती | टेलि. क्र. | ईमेल आयडी |
|---|---|---|
| श्री. सागर भद्रा, एव्हीपी - "बीओबीसीएपीएस" | +९१ ७६६६४१२३९५ | project.beta@bobcaps.in |
| श्री. हेमंत गुप्ता, एसएम - "बीओबीसीएपीएस" | +९१ ९८१९४३६२७६ | |
| श्री. एस. धरणी भास्कर, मुख्य व्यवस्थापक, एलसीबी | +९१ ९६७७०२१९७९ | cb2636@canarabank.com |
| श्री. अमित कुमार, व्यवस्थापक, एलसीबी | +९१ ९९५५५२७३९९ | |

**महत्त्वाची अस्वीकरणे :**

(१) ही दोन-स्तर प्रक्रिया आहे : स्तर १ यामध्ये अँकर बोलीदार ओळखण्याकरिता प्रत्यक्ष बोली प्रक्रियेचा समावेश आहे; स्तर २ यामध्ये यशस्वी बोलीदार ठरविण्याकरिता, धनकोच्या सक्षम प्राधिकरणाद्वारा अंतिम मान्यतेच्या विषयाधीन, एससीएम अंतर्गत ई-लिलावाचा समावेश आहे. (२) धनको / "बीओबीसीएपीएस" पूर्वोक्त वेबसाइट्सवर शुद्धिपत्र अपलोड करून, कोणतेही कारण व दायित्वाशिवाय, कोणत्याही वेळेत, काढून टाकण्याचा, मागे घेण्याचा, रद्द करण्याचा, फेरबदल करण्याचा किंवा त्यात विस्तार करण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत. (३) बोलीदार पूर्वोक्त वेबसाइटवर प्रसिद्ध झालेले कोणतेही अपडेट्स किंवा शुद्धिपत्रांची स्वतःला माहिती करून घेण्यास पूर्णतः जबाबदार आहेत. (४) बँकेचा निर्णय सर्व बोलीदारांना अंतिम, निर्णायक व बांधील असणार आहे. (५) ही जाहिरात प्रस्ताव कागदपत्र नाही आणि धनको / "बीओबीसीएपीएस"च्या भागावर कोणतीही बांधीलकी किंवा बंधनकारक नाही.

**स्वाक्षरी/-**
**द्वारा निर्गमित**
**स्थळ : बेंगालुरू**
**दिनांक : ०४ मे, २०२६**
**कॅनरा बँक, एलसीबी, बेंगालुरू**



**जनकल्याण सहकारी बँक लि.**
(शेड्युल्ड बँक)
*एकदा प्रत्यक्ष भेटा, बदल अनुभवा...*

**दमदार कामगिरी उत्तुंग भरारी**

(रु. कोटी मध्ये)

| मुख्य निर्देशक | आर्थिक वर्ष २०२५-२६ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|
| भाग भांडवल | ३६.०६ | ३६.९६ |
| ठेवी | १९९९.३५ | १८८७.९५ |
| कर्जे | ९१४.८६ | ८३९.२४ |
| एकूण व्यवसाय (ठेवी + कर्जे) | २९१४.२१ | २७२७.१९ |
| निव्वळ व्याज उत्पन्न | ८८.०५ | ७७.१६ |
| ऑपरेटिंग (ढोबळ) नफा | ५६.९८ | २२.०५ |
| निव्वळ नफा | ३२.५१ | १०.३६ |
| नक्त स्वनिधी | १४९.५६ | ११३.६५ |
| CRAR % | १७.६४ | १५.३१ |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे% | ४.५० | ८.५३ |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे% | ०.०० | ०.०० |

आमच्या या प्रवासात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार.


## वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

**बदलापूर:** कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर बापसई गावानजीक शुक्रवारी रात्री एका बिबट्याचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रस्ता ओलांडत असताना एका अज्ञात भरधाव वाहनाने बिबट्याला जोरदार धडक दिली. या अपघातात बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. शनिवारी सकाळी मृत बिबट्याचे शवविच्छेदन करण्यात आले. वनविभागाच्या अंदाजानुसार, मृत बिबट्या साधारण तीन वर्षांचा होता.


**खादी आणि ग्रामोद्योग आयोग**
Ministry of MSME (Govt. of India)
सी.बी.कोरा इंस्टीट्युट, शिंपोली गाव, म्युनसिपल शाळेसमोर, बोरीवली (पश्चिम)

**ब्युटीशियन कोर्स**
**शुक्र. दि. १५ मे २०२६ पासून**
प्रात्यक्षिकांसहीत प्रशिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन
सरकारी योजनांची माहिती व शासकीय प्रमाणपत्र
**फॅशन टेलरिंग कोर्स ॲडमिशन चालू**
**9137642095/022-28988581**
कालावधी- २५ दिवस | ५० लाखांची कर्ज योजना सबसीडी सहीत.





म्युच्युअल फंडातील गुंतवणुकी बाजारातील जोखमींच्या अधीन असतात, योजनेशी संबंधित सर्व दस्तैवज काळजीपूर्वक वाचा.